# प्रेसनोट

जा.क्र.स्थागुअशा/प्रेसनोट/ ११४८ /2020
पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग.
दुरध्वनी क्रमांक - 02362-228209
Email - cyber.sindhudurg@mahapolice.gov.in
दि.२१ /०५ /2020.

## अवैध दारु वाहतुकीवर कारवाई

कोरोना विषाणु संक्रमणाचे पार्श्वभुमीवर राज्यामध्ये सर्वत्र लॉकडाऊन घोषित करण्यात आलेला आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये संचारबंदी जारी करण्यात आलेली आहे. अशी पार्श्वभुमी असताना देखील काही इसम मद्य वाहतुक तसेच अवैधरित्या मद्य विक्रि करत असल्याबाबतची गोपनीय माहिती प्राप्त झालेनंतर दिक्षीत गेडाम, जिल्हा पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग यांनी केलेल्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा यांनी मौजे हळदीचे नेरुर तसेच दोडामार्ग,बांदा रोडवर सासोली- भटवाडी येथे अवैधरित्या दारु वाहतुक करणा-या दोन इसमांवर कारवाई करुन 14050/-रु.किंमतीची गोवा बनावटीची दारु तसेच 30,000/- रु.किंमतीचे वाहन असे एकुण 44,050/- रु.किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक सुनिल धनावडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन शेळके,पोह सुधीर सावंत,पोना कृष्णा केसरकर,पोना अनिल धुरी,पोना प्रविण वालावलकर,पोकॉ संकेत खाडये,पोकॉ सत्या पाटील,पोकॉ चंद्रकांत पालकर,पोकॉ ज्ञानेश्वर कांदळगावकर,पोकॉ रवी इंगळे यांनी केली.

(सुनिल धनावडे)
पोलीस निरीक्षक,
स्थागुअशा व जनसंपर्क अधिकारी,
सिंधुदुर्ग

प्रत- जिल्हा माहिती अधिकारी,सिंधुदुर्ग